# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577
**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

**Website**: www.jdroamt.org
**Fax No**: (0721) 2577913


क्रमांक :- विकाअ/शिक्षण /ईबीसी/२०२१/819
दिनांक :- 06.07.2021

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व अभियांत्रिकी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणा-या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- महाडीबीटी पोर्टलवर तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या योजनांसाठी संस्था स्तरावरुन मंजुर करण्यात आलेल्या ME/M.TECH अर्जाबाबत.**

**संदर्भ :-** १.मा.संचालक, तंशिस., म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १८/तंशिस/डीबीटी/विकाप/२०२१/२०९ दि. २/७/२०२१.
२.उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण २०१७/प्र.क्र.३३२/तांशि ४ दि. ७/१०/२०१७.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की , शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून माहीती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात येणा-या विविध योजनांकरीता बनविण्यात आलेल्या महाडीबीटी पोट्रलव्दारे www.mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनांकरीता, डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाहभत्ता योजना व अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजनेकरीता संस्थामार्फत अर्ज सादर करण्यात येत आहे.

परंतु असे निदर्शनास आले की, ME/M.TECH या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनांकरीता, डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाहभत्ता योजनांकरीता उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे संदर्भिय शासन निर्णयामध्ये नमुद करण्यात आलेला नसतांनाही या अभ्यासक्रमांमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांचे अर्ज लाभाकरीता या कार्यालयाकडे पाठविण्यात आलेले आहेत सदर शासन निर्णयाचे अवलोकन करावे. सदर अभ्यासक्रमासाठी अर्ज पात्र नसतांनाही या कार्यालयाकडे का पाठविण्यात आले आहे. याचा खुलासा ८ दिवसात या कार्यालयास सादर करावा. तसेच शासन निर्णयाप्रमाणे पात्र नसतांनाही जर अर्ज

मंजुर झाले असल्याची त्याची संपुर्ण जबाबदारी आपली राहील व यानंतर सदर अभ्यासक्रमाचे अर्ज या कार्यालयाकडे पाठविले जाणार नाही, याची संस्थाप्रमुखांनी कटाक्षाने नोंद घ्यावी. व तश्या सुचना आपणमार्फत सदर काम हाताळणा-या कर्मचा-यांना देण्यात याव्यात.

**(डॉ. आर.पी. मोगरे)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.